Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# भारतीय महिलांची साहित्य क्षेत्रातील वाटचाल

**डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे,** सहयोगी प्राध्यापक, स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालय म्हसदी ता. साक्री जि. धुळे

**प्रस्तावना**

19 व्या शतकात महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यासारख्या समाजसुधारकांनी स्त्री उन्नतीसाठी अथक प्रयत्न केले. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवल्यानंतर महिलांमध्ये जागृती घडून आली. शिक्षणाचा प्रसार आणि तिला झालेल्या 'स्व' अस्तित्वाची जाणीव यामुळे महिलांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. भारतात खऱ्या अर्थाने 1971 मध्ये स्त्री मुक्ती चळवळीला सुरुवात झाली. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यामध्ये तिला समान दर्जा देण्यात आला. समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे महिलांची पुरुष दास्यत्वातून मुक्तता झाली. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने 1995 मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. यानिमित्ताने भारतीय महिलांना विविध क्षेत्रात आपले कार्यकर्तृत्व दाखविण्याची संधी मिळाली. विसाव्या शतकात स्त्रीचं कुटुंबातील आणि पर्यायाने समाजातील स्थान उंचावले. आज महिलांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण केल्याचे दिसत आहे. साहित्य क्षेत्रही त्याला अपवाद नाही. मराठीत स्त्रियांच्या लेखनाची परंपरा फार जुनी व संपन्न आहे. विविध कालखंडात स्त्रियांनी लेखन केलेले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्रिया आपल्या समग्र अनुभवांना शब्दरूप देऊ लागल्या. स्त्रियांच्या पारंपारिक मानसिकतेत बदल होऊ लागला आणि त्याचे पडसाद स्त्रियांच्या लेखनात उमटू लागले. स्त्रीने तिच्या स्वतःच्या अनुभव विश्वातून निर्माण केलेले साहित्य खास तिचे आहे.

**बीज संज्ञा (Keywords) –** स्त्रीया, समाज, शिक्षण, क्रांती, स्त्रीवाद, स्वातंत्र्य, विचारसरणी, नवी दृष्टी

**उद्देश**

1. महिलांची साहित्य क्षेत्रातील वाटचाल समजून घेणे.
2. स्त्री जागृतीच्या कार्याचा आढावा घेणे.
3. स्त्री लेखिकांची साहित्य परंपरा समजून घेणे.
4. स्त्री साहित्याच्या लेखनाचे मूल्यमापन करणे

**गृहितके**

1. मराठीत स्त्रियांच्या लेखनाची परंपरा फार जुनी व संपन्न आहे.
2. स्त्रियांनी कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र असे विपुल प्रमाणात लेखन केले आहे.
3. स्त्रियांनी आपल्या व्यथा, वेदना साहित्याद्वारे व्यक्त केलेल्या दिसतात.
4. स्त्री शरीरनिष्ठ अनुभवांचे पडसाद स्त्रियांच्या लेखनात उमटले आहेत.

**विषय विवेचन**

19 व्या शतकात भारतात पाश्चात्त्य विद्येचा प्रसार होऊ लागला आणि एका मोठ्या युग परिवर्तनाला सुरुवात झाली. या काळात अनेक समाज सुधारकांनी स्त्री जागृतीचे कार्य केले. त्यात महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे


Copyright © | JET Network, All Rights Reserved

स्त्रियांना नवीन दृष्टी प्राप्त झाली. शिक्षणामुळे स्त्रिया स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. स्त्रियांच्या अस्मितेचा शोध सुरू झाला. आंतरराष्ट्रीय महिला दशक साजरे झाल्यानंतर स्त्री प्रश्नांची गंभीरपणे चर्चा होऊ लागली. स्त्रियांची विविध आंदोलने याच काळात घडू लागली. “विसाव्या शतकाच्या शेवटी जागतिक स्तरावर स्त्रियांच्या समस्येकडे लक्ष वेधण्यात आले. यातून स्त्रीवाद हा नवीन विचार प्रवाह आणि चळवळ पुढे आली.”[१]

पाश्चात्यांच्या विचारधारेतून ‘स्त्रीवाद’ ही विचारप्रणाली आपल्याकडे आली. स्त्रीवादात पुरुषी वर्चस्वाला नाकारून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणे अभिप्रेत आहे. स्त्रीला मिळालेले दुय्यम स्थान व कनिष्ठत्त्वाची वागणूक नाकारून तिच्याकडे माणूस म्हणून बघणे म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्री मुक्ती हा सामाजिक सुधारणेचा आणि प्रगतीचा महत्त्वाचा घटक मानून एक चेतना स्त्रियांच्या लेखनाला प्राप्त झाली. बदलत्या सामाजिक परिवर्तनाच्या जाणीवा स्त्रियांच्या लेखनात उमटू लागल्या. गावाचं शहरीकरण, विवाहाचं वाढतं वय, विभक्त कुटुंब, वाढती महागाई, जगण्याच्या वाढत चाललेल्या गरजा, अर्थार्जनात आणि कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रियांचा वाढता सहभाग स्त्रियांच्या लेखनातून जाणवू लागला. कुवारपण, ऋतुप्राप्ती, गर्भधारणा, मातृत्व अशा टप्प्याटप्प्यांनी येणाऱ्या स्त्रीनिष्ठ अनुभवांना लेखनात स्थान मिळाले. समाजाने निर्माण केलेले नीती अन् चारित्र्याचे निकष तिच्या फक्त लैंगिक जीवनाशी बांधलेले आहेत. “स्त्रीचा गौरव होतो तो ही तिच्या लैंगिकतेमुळेच अन् अवहेलना होते ती ही लैंगिकेमुळेच.”[२] पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन यात लैंगिक भाग महत्त्वाचा असतो.

**कथा साहित्य –** काशीबाई कानिटकर, गिरजाबाई केळकर, वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै, शांता शेळके, कमल देसाई, छाया दातार, प्रमिला इंगोले, गौरी देशपांडे, सानिया, ज्योत्स्ना देवधर, तारा वनारसे, लीला श्रीवास्तव, वसुधा पाटील, आशा बगे, विजया राजाध्यक्ष, मेघना पेठे, अंबिका सरकार अशा अनेक लेखिकांनी कथा वाङ्मय समृद्ध केले. ही वाटचाल आजतागायत सुरू आहे. स्त्रियांच्या पारंपरिक मानसिकेत झालेला आमूलाग्र बदल आणि त्याचे पडसाद स्त्रियांच्या लेखनात उमटू लागले. आपल्या कथालेखनातून स्त्रियांनी विविध अनुभवांना वाट मोकळी करून दिलेली दिसते. स्त्रीनिष्ठ शरीर अनुभवांकडे सामाजिक पारंपारिक दृष्टिकोनातून बघण्याऐवजी स्त्रीसृजन शक्ती सत-तत्व म्हणून बघण्याची मानसिकता आपल्या कथालेखनांतून दिली.

इ. स. 1896 मध्ये शांताबाई यांची ‘मासिक मनोरंजन’ मध्ये पहिली कथा प्रकाशित झालेली आढळते. तथापि, विभावरी शिरूरकर यांचा ‘कळ्यांचे नि:श्वास’ (1933) हा कथासंग्रह प्रकाशित होईपर्यंत स्त्रियांच्या कथांना खरे सत्व गवसल्याचे आढळत नाही. विभावरी शिरूरकरांनी प्रौढ स्त्रियांच्या मनातील ताणतणावांना घेऊन कथा लिहिल्या. स्त्रियांचा कोंडमारा करणाऱ्या प्रथा व रुढींवर प्रहार करणाऱ्या विषयांमध्ये कथाबीज शोधले. 1945 ते 1960 या काळातील महत्त्वाच्या लेखिका म्हणून कुसुमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै यांचा उल्लेख करावा लागेल. कमल देसाई यांच्या कथेने मनोविश्लेषणाच्या अंगाने व्यक्तीमनाचे विविध स्तर पारदर्शी केले आहेत. सुशिक्षित, नोकरी करणारी शहरी स्त्री हा त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे. एकाकी, समाजापासून फटकून वागणाऱ्या स्त्रीचा भावनात्मक संघर्ष त्यांच्या कथेत आहे. त्यांच्या कथालेखनाविषयी अंजली सोमण म्हणतात, “संज्ञा प्रवाहांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे कमल देसाई यांच्या कथांमध्ये भूतकाळ, वर्तमान काळ व भविष्यकाळ यांची सरमिसळ झालेली दिसते.”[३]


Copyright © | JET Network, All Rights Reserved

स्त्रीवादी कथा साहित्यात गौरी देशपांडे व प्रिया तेंडुलकर ही लक्षवेधक व प्रभावी नावे. त्यांची कथा अनुभवाला थेट भिडणारी व लवचिक स्वरूपाची आहे. त्यांच्या कथेत सहजता, स्वाभाविकता आहे. त्यांची कथा वास्तवाशी नाते सांगते. गौरी देशपांडे यांचे लिखाण स्त्रीकेंद्री आहे. त्यांच्या कथांतून स्त्री-पुरूष नात्यातल्या सहजपणाचं आणि मनमोकळेपणाचे दर्शन होते. नीती अनितीच्या रुढ कल्पनांना धक्का देणारं तसेच मुक्त सहजीवनाचा पुरस्कार करणारं, स्त्री – पुरुष संबंधांचा निसंकोच चित्रण गौरी देशपांडे करतात.

विजया राजाध्यक्ष यांचं लेखन माणसा माणसांतील भाव संबंधांचे चित्रण करताना दिसते. वैचारिक सूक्ष्म ताण-तणाव त्यांच्या कथेत येतात.

आशा बगे यांची ‘रुक्मिणी’ ही कथा विशेष गाजली. स्त्रीची अगतिकता तिच्या अनाथपणात, आर्थिक दुबळेपणात असल्याचे त्यांच्या कथेत चित्रित झालेले दिसते.

मेघना पेठे यांच्या लेखनात वाचनाने लैंगिक समस्या याचं धिटाईचं आणि अंगावर येणारं वर्णन आहे. स्त्रीची मानसिकता, तिचे शरीर अनुभव याचा अचूकपणे वेध त्यांची कथा घेते.

निरजा यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी स्त्री – पुरुष आहेत. प्रौढ स्त्री ही त्यांच्या कथांतून वारंवार येते. अनुभव, प्रिय माझा, आक्रमकता या कथा उल्लेखनीय आहेत.

सानिया यांच्या कथेतून कौटुंबिक नातेसंबंधाचे बदल उलगडताना दिसतात. स्वतंत्र विचारांची व निर्णयक्षम स्वभावाची स्त्री त्यांच्या कथेत आढळते.

**कादंबरी विश्व** – आज मराठी कादंबरीच्या क्षेत्रात पुरुषांच्या बरोबर स्त्री लेखिकांनी लेखन केलेले आहे. त्यांचा कादंबरी लेखनात सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आणि उपयुक्त आहे. स्त्रियांचे कादंबरी लेखन हे स्त्री सुधारणे कडून स्त्री स्वातंत्र्याकडे विकसित होताना जाणवते. आधुनिक काळात शिक्षणाने स्त्रियांना नवी दृष्टी दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचे अनुभवविश्व अधिक व्यापक व व्यामिश्र होतांना दिसून येते. स्त्री लेखिकांची परंपरा ही हरिभाऊंच्या कालाइतकी पूर्वीची आहे. इ.स. 1885 पूर्वीच यांच्या कादंबरी लेखनाला सुरुवात झालेली होती. साळूबाई तांबवेकरांची ‘चंद्रप्रभाविरह वर्णन’ ही कादंबरी 1873 मध्ये प्रसिद्ध झाली. या कादंबरीने स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा पाया घातला. 1885 ते 1920 या कालखंडात लेखिकांनीही मराठी कादंबरी वाङ्मयात मौलिक भर घातलेली आहे. 1925 नंतर विभावरी शिरूरकर, गीता साने, कुमुदिनी प्रभावळकर, शांताबाई नाशिककर, कमला सोहोनी, मालतीबाई दांडेकर, आनंदीबाई शिर्के यांनी कादंबरी लेखन करून काही जुन्या प्रश्नांबरोबरच नवीन प्रश्नांनाही वाचा फोडलेली आहे. गीता साने यांनी स्त्री स्वातंत्र्याशी निगडित असलेल्या वेगवेगळ्या समस्या त्यांनी चित्रित केलेल्या आहेत. त्यात कौटुंबिक संबंध, स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पती-पत्नी संबंधांवर होणारा परिणाम इ. कितीतरी समस्या गीता साने यांनी हाताळलेल्या आहेत.

विभावरी शिरूरकरांची ‘बळी’, ज्योत्स्ना देवधर यांची ‘घरगंगेच्या काठी’, ‘कल्याणी’, सुमती क्षेत्रमाडे यांच्या ‘आधार’, ‘महाश्वेता’, सुलोचना देशमुख ‘आदिमात्रा’, ‘काचापाणी’ आणि ‘कामायणी’या सर्वांमधून स्त्री मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. कमल देसाई यांनी ‘रात्रंदिन आम्हा’, ‘काळा सूर्य’, ‘हॅट घालणारी बाई’ या कादंबऱ्यांतून स्त्री जीवनातील विविध पदर आणि परिमाणे सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक, तात्विक पातळयांवरून अत्यंत थेटपणे उलगडून दाखविले आहेत. गौरी देशपांडे यांच्या ‘एकेक पान गळावया’, ‘निरगाठी’, ‘दुस्तर हा घाट’, ‘तेरूओ’, ‘काही दूरपर्यंत’ या कादंबऱ्यांमधून “जीवनविषयक आकलनाचा आणि शोधाचा केंद्रबिंदू स्त्री हाच आहे. ही स्त्री आधुनिक आहे, स्वतंत्र आणि मुक्त अशा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आत्मप्रेरणांना धीटपणाने स्वीकारणारी स्त्री आहे. व्यक्ती स्वातंत्र्य हे मूल्य जबाबदारीने गौरी देशपांडे प्रक्षेपित करतात."[४]

स्वातंत्र्योत्तर काळात लोकप्रिय लेखिका म्हणून कुसुम अभ्यंकर, शैलजा राजे, शकुंतला गोगटे, योगिनी जोगळेकर, ज्योत्स्ना देवधर, निर्मला देशपांडे आदींचा उल्लेख करावा लागतो.

**कविता -** कविता या वाड्.मय प्रकारात देखील महिलांनी आपला ठसा उमटवलेला आहे. मुक्ताबाई, जनाबाई, वेणाबाई अशी महदाई पासून सुरू झालेली काव्य लेखनाची परंपरा अर्वाचीन काळात लक्ष्मीबाई टिळक, मनोरमाबाई रानडे, कमलाबाई देशपांडे, दुर्गाबाई जोशी, शांताबाई नाशिककर, अपर्णा देशपांडे इत्यादींनी जोपासली. त्याचबरोबर बहिणाबाई चौधरी, संजीवनी मराठे, इंदिरा संत, पद्मा गोळे, शांता शेळके, उमाबाई लिमये, मंदा बोडस, शिरीष पै, पद्मा लोकुर, वंदना विटणकर, सुलोचना घोटीकर, योगिनी जोगळेकर, अपर्णा देशपांडे, ललिता बापट, सुशीला मराठे, अंजली जोशी, स्नेहलता किनरे, शरदिनी महाडेश्वर, हिरा बनसोड, रजनी कृष्णनकुट्टी अशा अनेक कवयित्रींनी मराठी कवितेच्या विकासास हातभार लावलेला आहे.

स्त्रियांच्या कविता या अतिशय संवेदनशील अशा आहेत. अलीकडच्या काळात अश्विनी धोंगडे, मल्लिका अमर शेख, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर, हेमा लेले, अंजली कुलकर्णी, प्रज्ञा लोखंडे, आसावरी काकडे, निरजा, प्रज्ञा पवार, कविता महाजन यासारख्या कवयित्रींनी गंभीरपणे लेखन करून अतिशय विचारप्रवण कविता लिहिलेल्या आहेत.

**आत्मचरित्र -** आत्मचरित्र हा अगदी अलीकडे विकसित झालेला वाड्.मय प्रकार आहे. मराठीत जी आत्मचरित्र लिहिली गेली त्यातील चांगली आत्मचरित्रे स्त्रियांनी अधिक लिहिली आहेत. एका अर्थाने ती पती चरित्र आहेत. अनुभवाची तीव्रता इतर कोणत्याही वाड्.मय प्रकारापेक्षा आत्मचरित्रात अधिक जाणवते. स्त्रियांच्या मनात कोंडलेला असंतोष, भाव-भावना, वासना, पातिव्रत्याच्या कल्पनेला झुगारून त्यांच्या आत्मचरित्रातून बाहेर येत आहे. स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे प्राधान्याने आठवणींची माळ गुंफणारी आणि या आठवणीतून सहजीवनाचे चित्रण करणारी आहेत. त्यांची आत्मचरित्रे ही त्यांच्या जीवनाची साक्षीदारच आहेत.

**रमाबाई रानडे -** आमच्या आयुष्यातील काही आठवणी, लक्ष्मीबाई टिळक - स्मृतीचित्रे, पार्वतीबाई आठवले- माझी कहाणी, आनंदीबाई कर्वे - माझे पुराण, कमलाबाई देशपांडे – स्मरणसाखळी, लिलाबाई पटवर्धन - आमची अकरा वर्षे, रोहिणी भाटे – माझी नृत्यसाधना, गिरजाबाई केळकर - द्रौपदीची थाळी, सत्यभामाबाई सुखात्मे - गेले ते दिवस, सरोजिनी शारंगपाणी - दुर्दैवाशी दोन हात, इंदिरा मायदेव – स्मृतितरंग, गंगुताई पटवर्धन - चाकोरीबाहेर, आशालता सावे - पानाआडचे फुल, आनंदीबाई शिर्के – सांजवात, शांता आठवले - आंब्याची डहाळी ही आत्मचरित्रे उल्लेखनीय आहेत.

अलीकडील हंसा वाडकर - सांगत्ये ऐका, आनंदीबाई विजापुरे - अजून चालतेची वाट, माधवी देसाई- नाच गं घुमा, गोदावरी परूळेकर - जेंव्हा माणूस जागा होतो, मल्लिका अमर शेख - मला उध्वस्त व्हायचं, सुनिता देशपांडे - आहे मनोहर तरी, सिंधुताई सपकाळ - वनवासी फुल, कुमुद पावडे - अंत:स्फोट, शांताबाई कांबळे - माझ्या जन्माची चित्तरकथा, बेबी कांबळे - जीणं आमुचं, नजुबाई गावित - आदोर असा हा आत्मचरित्राचा अखंड प्रवाह सुरू आहे.

**समारोप**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

साहित्य क्षेत्रातील महिलांची वाटचाल लक्षणीय आहे. स्त्री लेखिकांची परंपरा ही फार पूर्वीची आहे. अगदी बुद्धकालीन गाथापासून भक्तीकाळातील स्त्रियांचे लेखन, आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्र आत्मचरित्र आणि वर्तमान आधुनिक काळातील बंडखोर लेखन एकत्र सापडते. शिक्षणामुळे स्त्रियांना नवी दृष्टी प्राप्त झाल्याने ती स्वतंत्रपणे विचार करू लागली. स्त्रियांनीही आपल्या व्यथा वेदना साहित्याद्वारे व्यक्त केलेल्या दिसतात. विवाहित व भावनामय जीवनावरच स्त्री लेखिकांचे लक्ष केंद्रित झाले. स्त्रीयांच्या कथा या त्यांचे लग्न, त्यांचे शरीर, त्यांचे मन आणि त्यांची नोकरी या विषयांना घेऊन व्यक्त झालेल्या दिसतील. बालविवाह, विधवा विवाह, पुनर्विवाह, परित्यक्ता, नि:संतान, स्त्रीयांचे दुःख, वर निवडण्याचे स्वातंत्र्य नसणे, नावडता पती मिळणे, जुलमी पती मिळणे, अरसिक पती मिळणे, पतीचे विवाहबाह्य संबंध असणे अशा विषयांना घेऊन कथा लिहिलेल्या आढळतात. तशा पती बरोबरच प्रियकर, मित्र, कार्यालयातील बॉस, प्रेम, निखळ मैत्री, विवाहबाह्य संबंध, कुमारी माता, लैंगिक सुख आदी विषयांवरही कथा लिहिलेल्या दिसतील. 1935 ते 1947 हा कालखंड मराठी स्त्री कादंबरी लेखिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. विषय, आशय, कादंबरीचे प्रकार, अभिव्यक्तीचे तंत्र या सर्व बाबतीत समर्थपणे व आत्मविश्वासाने लेखन केले.

**संदर्भ**

1. डॉ. स्मीता मेहेत्रे – “भारतीय स्त्री आणि मानवाधिकार”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. ५७
2. डॉ. तारा भवाळकर – “स्त्री मुक्तीचा आत्मस्वर”, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, पृ. ११८
3. अंजली सोमण - मराठी कथेची स्थितीगती, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९५
4. संपा. अनिरुद्ध कुलकर्णी – प्रदक्षिणा, खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. २५९
5. डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर - मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.
6. डॉ. वंदना महाजन - मराठी कादंबरीतील स्त्रीवाद, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
7. भालचंद्र फडके - मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन
8. विद्युत भागवत - स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved